www.csmit.in

# CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ INSTITUTE OF TECHNOLOGY

Affiliated to the Mumbai University, Approved By AICTE - New Delhi.
DTE Maharashtra (DTE Code : 3477)
Old Mumbai-Pune Highway, Near Shedung Toll Plaza, Shedung-Panvel - 410206.
Tel.: 02143 - 239091. Mob.: +91-865678500 / 501. Email : swc.mumbai@gmail.com

Ref. No. CSMIT/EBC-03/2016-17

Date : 26 OCT 2016

## NOTICE FOR EBC CONCESSION 2016-17

## "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना"

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पात्रतेचे निकष :

1. सदर योजना ही खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये / तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत /स्वयं अर्थसहाय्य विद्यापीठे वगळून) आणि शासकीय , शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतनामधील (शासकीय अभिमत विद्यापीठासह) शासन निर्णय दि. 13 ऑक्टों. 2016 मध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रमासाठी शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रकीयेव्दारे (CAP) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागु राहील.

2. सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबांचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.2.50 लाख व त्यापेक्षा कमी आहे. अशा प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाव्दारे निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या 50 टक्के पर्यंतची प्रतिपुर्ती शासनाकडून करण्यात येईल. व ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित ) वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.2.50 लाख ते रु. 6 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी पदवी / पदव्युत्तर पदवी/ इयत्ता 12 वी नंतरच्या पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता 12 वी परिक्षेमध्ये व इयत्ता 10 वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता 10 वी च्या परिक्षेमध्ये एकत्रित किमान 60 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त असतील अशाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून शिक्षण शुल्काच्या 50 टक्के इतकी प्रतिपुर्ती करण्यात येईल.

3. सदर योजनेतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित येणारे अभ्यासक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| 1 | पदविका | अभियांत्रिकी, औषधनिमाणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी |
| 2 | पदवी | अभियांत्रिकी, औषधनिमाणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी |
| 3 | पदव्युतर पदवी | मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कंमप्युटर अप्लिकेशन |

26 OCT 2016

Chhatrapati Shivaji Maharaj Institute of Technology DTE Code : 3477

PRINCIPAL
CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ INSTITUTE OF TECHNOLOGY
OLD MUMBAI-PUNE HIGHWAY, NEAR SHEDUNG TOLL PLAZA,
SHEDUNG-PANVEL-410206.

4. <u>वरील नमूद राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष 2016-17 व त्यापूर्वी ज्या विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विदयार्थ्यांसह जे विदयार्थी वरील अटींची पूर्तता करतील अशा सर्व विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल.</u>

5. या योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या लाभार्थी विदयार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी महाविदयालयाच्या संबंधित अभ्यासक्रमाकरीता शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाने (शासकीय संस्थांकरीता शासनाने ) निर्धारित केलेले शिक्षण शुल्काची शासनाकडुन या योजनेंतर्गत प्रतिपूर्ती संबंधित शैक्षणिक संस्थेस करण्यात येईल.

6. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्राधिकरणाने निर्धारीत शिक्षण शुल्काच्या 50 टक्के मर्यादेपर्यंतची प्रतिपुती शासनामार्फत करण्यात येईल.

7. सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष 2015-16 पुर्वी वा चालु शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पुर्ण कालावधीपर्यंत या शासन निर्णय दि. 13 ऑक्टोबर, 2016 तील अटी शर्तीनुसार लागू राहील.

8. उच्च व तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या संबधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, असे विद्यार्थी या योजनेअंतर्गत लाभास पात्र असतील.

9. सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

10. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.

11. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनापैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती/ शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास सदर विद्यार्थी या योजनेतंर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

12. लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहील व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परिक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधित उपसंचालक / सहसंचालक व सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

13. पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुतीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र राहील. तथापी, तद्नंतर पुनश्च: त्या सत्रात /वर्षात परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेच्या लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

14. परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधित दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पुर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश

Chhatrapati Shivaji Maharaj Institute of Technology DTE Code : 3477

26 OCT 2016

PRINCIPAL
CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ INSTITUTE OF TECHNOLOGY
OLD MUMBAI-PUNE HIGHWAY, NEAR SHEDUNG TOLL PLAZA,
SHEDUNG-PANVEL-410206.

मिळाला नसेल तर संबधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभा करीता कायमस्वरूपी अपात्र ठरेल.

15. लाभार्थी विदयार्थी व संबधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेतंर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चुकीची अथवा दिशाभुल करणारी माहीती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमांच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच त्या विद्यार्थ्याला / संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चुकीच्या माहीतीच्या आधारे त्यापुर्वी मिळालेल्या लाभाच्या संपुर्ण रकमेची व्याजासह वसुली करण्यात येईल व कोणत्याही योजनेतंर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

16. संबंधित विद्यार्थी स्वत:ला चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीशिवाय अनियमितंपणे गैहजर राहणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपुर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

17. ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपुर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपुर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसुल केली जाईल.

18. सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूध्द करता येणार नाही.

19. सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विद्यापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश व विदयार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक ( प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, 2015 मधील तरतुदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करून अंतिम करणे आवश्यक राहील.

Chhatrapati Shivaji Maharaj Institute of Technology
DTE Code : 3477

26 OCT 2016

PRINCIPAL
CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ INSTITUTE OF TECHNOLOGY
OLD MUMBAI-PUNE HIGHWAY, NEAR SHEDUNG TOLL PLAZA,
SHEDUNG-PANVEL-410206.

3/3